Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

प्राचीन काळ
हत्तरसंग कुडलसंगम (जि. सोलापूर)येथील शिल्पवैभव - सुरसुंदरी

डॉ. संजय गायकवाड

इतिहास विभाग प्रमुख मा.ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर

सुरसुंदरी :-

भारतीय संस्कृती आणि जीवनप्रणाली शिल्पांमधून साकार करण्याचे श्रेय शिल्पकारांना आहे. शिल्पकारांची शिल्पलिपी कमल कालिकेच्या शालीन भाषेची आहे. (१ पृ. क्र. १९) भारतीय कलाकारांनी सौंदर्यवादी दृष्टीकोन व निसर्गातील विविध तत्वांना कलेत स्थान देवून मुर्तीकलेच्या अविष्कारातून आदर्शवादाची जाणीव करून दिली. (२ पृ.क्र. १५६) शिल्पकारात धैर्य, संयम, एकाग्रता, प्रतिभाशाली, हस्तकौशल्य असल्यानेच शिल्पकलेत शृगांर हास्य, करूण, शांत, अद्भत या भावरसाबरोबरच वीर, रौद्र, बीभत्स, आणि भयानक इत्यादी भावभावना प्रतमेत उतरवत असतो. मानवाच्या स्थायी भावभावना आपण मुर्तीवर आरोपित करतो. (१ पृ.क्र. १८)

भारतीय मुर्तीकलेचा उगम देवपूजेतून झाला. प्राचीन काळातील बहुतेक मुर्ती देवदेवतांच्या असून त्या पूजेच्या उद्देशाने बनविलेल्या दिसतात. (३ पृ.क्र. ४४४) मूर्तीच्या चेहऱ्यावरील भावभावनातून आंतरिक भावनांचे प्रतिबिंब स्पष्ट करण्यात येते. दैवी व आध्यात्मिक भावना लौकीक माध्यमातून अभिव्यस्त करण्यात आल्या आणि मूर्तीच्या शरीरसौष्ठत्वद्वारे त्या देवतेचे वेगळेपण व वैशिष्टये प्रतबिंबीत करण्यात आले. (२पृ.क्र. १५४) भारतीय संस्कृतीमध्ये शिल्पशास्त्राचे विश्वकर्मा आणि महर्षी शुक्राचार्य हे आदयप्रवर्तक आहेत. कोणत्याही मूर्तीच्या अथवा कलाशिल्पाच्या घडणावळीत तालमानला काय महत्वाचे स्थान दिलेले आहे. त्याच्या परिमाणांचा किंवा मोजमापाच्या आधारानेच पाषाणखंडातून मूर्ती किंवा कलाशिल्प साकार केले जाते. शिल्पसंहितेने ठरवून दिलेली परिमाणे किंवा मोजमापे हाताची मूठ आणि अंगुली (बोटे) अशी नैसर्गिक असतात. (१ पृ.क्र. ४०) कश्यप आणि अगस्त हे महान मूर्तीशास्त्रज्ञ समजले जातात. कश्यप यांचा " अंशुमदभेद " या ग्रंथात आणि अगस्ती यांच्या " आगस्तीय सकल्पाधिकार " या ग्रंथात मूर्तीशास्त्राविषयी माहिती मिळते. (३ पृ.क्र. ४४५)

मूर्तीकलेची माहिती मत्स्यपुराण, अग्निपुराण, स्कंदपुराण, पद्मपुराण, लिंगपुराण, भविष्यपुराण, विष्णुपुराण इ. ग्रंथात मूर्तीशास्त्रांची माहिती मिळते. सुंप्रेभदायम,, वैश्वानसागम, अंशुभदागम या ग्रंथात मूर्ती कलेची माहिती मिळते. मूर्ती विज्ञानाची माहिती मिळते. समरांगजसूत्रधार विश्वकर्मावतार या ग्रंथात दक्षिण भारतीय मूर्ती कलेची माहिती मिळते. (२ पृ.क्र. १५७-१५८) रामायण, महाभारत, पुराणे यामध्ये मूर्ती कलेविषयी बरीच माहिती मिळते वैष्णव आगम व गोपाल भट्टचा हरिविकास या ग्रंथात वैष्णव मूर्तीची माहिती मिळते. (३ पृ.क्र. १४४-१४६) शिल्पशास्त्राच्या दृष्टीने सांप्रत अपराजितपृच्छा, अपराजितवास्तुशास्त्र मानसार, मानसोल्लास, समरांगणसूत्र, मयमत आणि शिल्परत्न इत्यादी महत्वाचे व प्रसिध्द ग्रंथ आहेत. (३ पृ.क्र. ४४५)

सूरसुदरीची संकल्पना :-

ब्रम्ह, विष्णु, शिव, जिन इ. देवतांच्यामंदीरातील मंडप, वितान भिंतीवर इ. ठिकाणी ३२ उपयुक्त देवकन्या नृत्य करताना दाखवल्या जातात. ईशान्य दिशेपासून प्रदक्षिणा मार्गावर क्रमशः प्रकार केारलेल्या असतात. (४ पृ.क्र. ६४)

भारतातील अनेक मंदिराच्या बाहय भिंतीवर स्त्रियांची शिल्पे केारलेली आहेत. वास्तुशात्रात सुरसुंदरी अशी ओळख आढळते. या सुरसुंदरी म्हणजे अप्सरा, पऱ्याच होत असा समज आहे. शिल्पप्रकाशानुसार १६ सुरसुंदरी आहेत तर क्षीरार्णवा नुसार ३२ सुरसुंदरी आहेत. (५४ पृ.क्र. ५)

शिल्पशास्त्रात ३२ स्वर्गसुंदरी नृत्यागंणा अप्सरा यांचे वर्णन मिळते तर काही ग्रंथात २४ सुरसुंदरीचे वर्णन आढळते. सगळयाची नावे वेगवेगळया ग्रंथात निरनिराळी आढळतात. परंतू काही नावे सारखी आहेत ती ३२ प्रकारची आहेत. वृक्षार्णन, क्षीरार्णव आणि काही प्राचीन हस्तलिखीत ग्रंथात काही नावे वेगवेगळी पहावयास मिळतात. पूर्व भारतातील उडीसा मधील " शिल्पप्रकाश " ग्रंथात १६

प्रकारच्या सुरसुंदरीचे स्वरूप, त्यांची अनेक लक्षणे, नावे इत्यादी बाबत वर्णन आणि रूप याच्या वर्णनावरून ही नावे वेगवेगळी दिल्याची संभावना आढळते.(४ पृ.क्र. ६४)

भारतीय मंदीराचे दर्शन म्हणजे षडदर्शनापैकी एक असे अभिप्रेत असते. विषम किंवा विकार हे नाहीसे व्हावे लागते. त्याचे दमन करावे लागते. रूप ,रस, गंध, शब्द आणि स्पर्श यांची आणि इतर विचारांची कल्पना करून देण्यासाठी तसेच स्वतःची ओळख, निर्मलदृष्टी इत्यादी विषयी काही सुचविण्यासाठी सुरसुंदरी केारलेल्या असतात. (५ पृ.क्र. ५) शिल्पांकित सुरसुंदरी या आकर्षक देह यष्टीच्या नाजूक कटिभागाच्या, उन्नत स्तनाच्या असाव्यात असे शास्त्राकार सांगतात. त्याच्या भावपूर्ण चेहऱ्यामुळे आणि अर्थगर्भ हावभावामुळे त्या चित्ताकर्षक ठरतात. त्यांचे शिल्पांकन कधी मंदीराच्या पाषाण भिंतीवर तर कधी मंदीराच्या स्तंभावर शालभंजिकांच्या रूपात, तर कधी सज्जाच्या वा कक्षासनसच्या बाहयभिंतीवर विपुल प्रमाणात आढळतात. रसिक मनाच्या भक्तांचे डोळयाचे पारणे फिरावे असे त्याचे विलोभनीय विनम्र असतात. आपल्या अस्तित्वाने त्या अनेकाचे लक्ष वेधून घेतात.. (५ पृ.क्र. ८) मंदीरावरील विपुल प्रमाणातील त्यांच्या शिल्पकलाचे श्रेय त्या काळी विलक्षण लोकप्रीय असलेल्या व्यक्ती संप्रदयाकडे जाते. या मंदीराच्या धार्मिक वास्तू हळुहळु गावातील सांस्कृतीक हालचालींचे केंद्रे झाली होती. त्यामुळेच भक्तांच्यामध्ये नीती - मुल्ये निर्माण हे त्यांचे उत्तरदायित्व ठरले. कारण त्या आधारेच त्यांचा उध्दार व्हायचा होता मोक्ष दृष्टीपर्यंत यायचा होता. नृत्यांगणा, वादनमग्ना भक्तांचे मनोरंजन करणार, खरे तर देवाला अर्पण करावयाच्या रंगभोगाचे प्रतिक म्हणून त्या केारलेल्या असणार. अप्सरा त्यांना देवाकडे आकर्षित करणार आणि आपल्या विविध भावांनी, लक्षणांनी आणि गुणधर्मानी सुरसुंदरी भक्तांना इच्छा, वासना, मोह, विकार यांचेपासून परावृत्त करूने. पुण्यसंपन्न करणार त्यामुळेच तर मोक्षांचा मार्ग मोकळा व्हायचा असतो. (५ पृ.क्र. ८-९)

शिल्पप्रकाश ग्रंथात अलसा, तोरणा, मुग्धा, डालमलिका, पद्मगंधा, दर्पणा, विन्यसा, मातृमर्ती/ पुत्रवल्लभा मर्दला नूपूरपादिका तर क्षीरार्णवात या ग्रंथात सुगंधा लीलावती जया विजया कर्पुरमंजिरी शुभगामिनी चंद्रावली, मरीचिका, शत्रूमर्दिनी, पत्रलेखिका, मेनका, विधिचित्ता, पद्मीनी, गूढशब्दा, गौरी, उर्वशी, रंभा इ. माहिती आढळते याशिवाय आणखीही काही सुरसुंदरीचे शिल्पाकन आपल्याकडील मंदीरावर आढळते. सुरसुंदरी ज्या भावभावना, गुणधर्म वा हेतू प्रकट करतात ते सर्वच ठिकाणी आढळत असेल तरी कलेच्या दृष्टीने त्यांच्या प्रकटीकरणात वेगळेपण असल्याचे जाणवते. (५ पृ.क्र. ९)

विषम मांडणीच्या सोयीसाठी व सुकरतेसाठी या सर्व सुरसुंदरीची विभागणी
१) सौंदर्य प्रसाधनात निमग्न असलेल्या सुरसुंदरी
२) नृत्यमग्न आणि वादय वाजविणाऱ्या सुरसुंदरी
३) स्वर्गीय यौवना या सुरसुंदरी
४) संकीर्ण प्रकारातील सुरसुंदरी (५ पृ.क्र. १०)

हत्तरसंग कुडल संगम हे ठिकाण सोलापूर शहराच्या दक्षिण दिशेला आहे. हत्तरसंग कुडल संगम हे गाव दक्षिण सोलापूर तालुक्यात आहे. भीमा व सीना या नदयाचा संगम हत्तरसंग या गावाजवळ झाल्याने या ठिकाणाला हत्तरसंग कुडल संगम असे म्हटले जाते. कानडी भाषेत “ कुडल ” म्हणजे संगम होय. (६ पृ.क्र. १)

हत्तरसंगकुडल संगम येथील हरिहरेश्वर मंदीरातील स्वर्गमंडपात अद्वितीय स्वरूपाचा शिल्पाचा अविष्कार पहावयास मिळतो. मंदीराच्या सजावटीत देव देवतांच्या मर्ती बरोबरच सुरसुंदरी, भारवाहक, गंधर्व, विदयाधर, किन्नर, गजमुख आणि कमलपुष्प इत्यादी उत्तम कलाकृती पहावयास मिळतात. प्रत्यक्ष स्वर्गमंडपात स्वर्गीय सौंदर्याची कलाशिल्पे येथील प्रतिभाशाली कलाकारांनी साकार करून पृथ्वीवर साक्षात स्वर्गाचे नंदनवन उभारलेले आहे. येथील सुरसुंदरीचे मोहक, मादक आखीव रेखीव आणि सौष्टवयुक्त शरीर-बांध्याचे कलाशिल्पे आकर्षक बनवून ही सौंदर्यकृती मनावर ठसा उमटवते. हरिहरेश्वर मंदीरातील स्वर्गमंडपात १४ सुरसुंदरीपैकी ८ सुरसुंदरी पहावयास मिळतात इतर ६ सुरसुंदरीचे शिल्पे पुर्णतः तुटलेली आहेत. येथील स्वर्गमंडपात एकूण १४ स्तंभ असून त्यावर या सुरसुंदरी हेात्या याची रचना पाहता प्रथम स्तंभ त्यावर कमलपुष्प, गजमुख, भारवाहक, गंधर्व शेवटी सुरसुंदरी असा वरच्या दिशेच्या क्रमाने ही शिल्पे आढळतात. येथील सर्व सुरसुंदरीचा पदविन्यास घडीव व गोलाकार असून त्याची उन्मान (उंची) २ फुट व प्रमाण (रूंदी) १ फूट असे असून सुरसुंदरीच्या शिरोभागी नक्षीकाम केलेले आहे. या सुरसुंदरी वादयसुंदरी, नृत्यसुंदरी, मदयकुंभवाहक सुंदरी इत्यादी स्वरूपातील आहेत.

सुरसुंदरी क्रमांक - १

शिल्पातील सुरसुंदरी त्रिभंगी अवस्थेतील चेहऱ्यावरील हावभाव आणि शरीराची आकर्षक रचना असलेली आहे. सुरसुंदरीचा चेहरा थोडासा डाव्या बाजूला तिरपा असून नजर डाव्या बाजूला खाली पहात आहे. सुरसुंदरीचा उजवा हात खांदयाबरोबर समांतर असून केापऱ्यापासून वरच्या दिशेला धरला असून हातातील वस्तू तुटलेली आहे तर डावा हात पुर्णपणे तुटलेल्या अवस्थेत आहे. सुरसुंदरीचे उपवस्त्र गळयाभोवती गुंडाळून पाठीमागे एक टोक उजव्या दंडावरून सरळ खाली सोडले आहे. तर दुसरे टोक पाठीवरून पुढे घेत

कमरेपयैत आणलेले असून ते डाव्या कटीभागावर सोडलेले आहे. उपवस्त्राला वळणदारपणा देवून आकर्षकता आणली आहे. अधोवस्त्र कमरेला गुंडाळलेले आहे. कटीसुत्र हे उरूदाम स्वरूपात घातले आहे. कटीसुत्राची समोरील बाजूस गाठ बांधून त्या वस्त्राच्या चुन्या उजव्या पायापर्यंत लोंबत आहेत अशा सोडल्या आहेत. कटीसुत्रावर अजून एक अधोवस्त्र दाखवले आहे. ते मुक्तदाम असून कमरेभोवती गुंडाळून त्याची गाठ डाव्या मांडीच्या बाजूला बांधून सोडली आहे. सुरसुंदरी अर्धसमपद आसनात उभी असून येथे श्रीकृष्णाच्या अर्धसमपद आसनाच्या विरूध्द पायाची ठेवण आढळते. सुरसुंदरीचा चेहरा समोर थोडासा तिरका असून नजर थोडीसी तिरकी दाखवली आहे. शिल्पातील केशरचना वाखणण्याजोगी आहे. डोक्यावरील सर्व केस पाठीमागे घेतलेले असून शिरोभागी डोळयाच्या मध्यभागी एक फूल केारलेले आहे. फुलाच्या मध्यबिंदू व नाकाचा शेंडा एका सरळ रेषेत ठेवण्यात कलाकाराला यश मिळाले आहे. कानामध्ये मोठया आकाराची जाड गोलाकार सुर्यवत कुंडले आहेत. गळयामध्ये जाड आकाराचे हिक्कासूत्र आणि उदरावर लोंबणारे हारवस्त्र घातले आहे. कमरेभोवती दोन पदरी तीन अर्धवर्तुळाकार नक्षीमध्ये मेखला आहे. हातात हस्तवलय पायैंत पादवलय आणि नुपुर दाखवले आहे. गळयातील एक माला गुडघ्याच्या खालपर्यंत लोंबताना दाखवली आहे.

सुरसुंदरी क्रमांक - २

सुरसुंदरी त्रिभंगी अवस्थेतील आलीढ आसनसमध्ये उभी असलेली आहे या सुरसुंदरीचा चेहऱ्यावरील काही भाग केापऱ्यापासून डावा व उजवा हात डाव्या पायाची मांडी ते घोटयापर्यंतचा भाग तुटलेला आहे. ही सुरसुंदरीची नजर समोर असून हलक्या स्वरूपात बाजूला खाली पहात आहे असे वाटते. ही सुरसुंदरी स्थानक स्वरूपात उभी आहे. केशरचनेत केसांना योग्य तो आकार देवून केस पाठीमागे सोडलेले आहेत डोक्यातील फुल थोडेसे डाव्या बाजूला असले तरी समोरून स्पष्टपणे दिसेल असे केारले आहे. वेशभूषेत अत्यंत तलम पारदर्शी वस्त्राचा वापर केला आहे. उपवस्त्र हे पाठीवरून पुढे घेवून डाव्या व उजव्या हाताला गुंडाळून खाली जमीनीच्या दिशेने मांडीवर सोडले आहे. अधोवस्त्रे दोन प्रकारची वापरली आहेत त्यातील एक मुक्तदाम असून कमरेभोवती गुंडाळून ते मांडीपर्यंत लोंबकळत असून त्याची गाठ पाठीमागे बांधली आहे. दुसरे अधोवस्त्र कटीसुत्र स्वरूपात कमरेला उरूदाम प्रकारात घातले आहे. कटीसुत्राची समोरील बाजूस गाठ मारून त्याची टोके दोन्ही पायाच्या मध्ये गुडघ्यापर्यंत सोडले आहे. सुरसुंदरीच्या गळयातील हिक्कासूत्र उदरावरती लोंबणारे हारसुत्र, जाडजूड दोन पदरी व तीन पदरी अंगद, कमरेला साधा व एक पदरी कमरपट्टा, गळयात पायाच्या घोटयापर्यंत लोंबणारी एक माला, पायात तोडे/नुपूर, पादवलय इत्यादी अलंकार असून सर्व अलंकार जाडजूड गोपासारखे दाखवले आहेत या सुरसुंदरीची केशभूषा, वेशभूषा विविध अलंकार आकर्षक स्वरूपात दाखवलेले आहेत.

सुरसुंदरी क्रमांक - ३

सुरसुंदरी त्रिभंगी अवस्थेतील आलीढ आसनामध्ये उभी आहे. सुरसुंदरीचा चेहरा किंचितसा उजव्या बाजूला तिरका असून कमरेमध्ये थोडासा बाक दिला आहे. त्याचप्रमाणे हातालाही बाक दिलेला आहे. स्थानक अवस्थेत उभी असलेली सुरसुंदरी आकर्षक व रेखीव बनवण्याचा प्रयत्न कलाकाराने केला आहे. कलाकाराने थोडासा गुडघा वाकवताना दाखवलेला गुडघा, पायाची बोटे यावरून कलाकाराची कसब स्पष्टपणे दिसते. या सुरसुंदरीचा बराचसा भाग चांगल्या स्थितीत आहे.फक्त डावा हात केापऱ्यापासून तुटलेला आहे. सुरसुंदरीचा चेहरा किंचित उजवीकडे झुकला असून नजर मात्र समोर आहे या नजरेतून समोरील व्यक्ती काहीतरी सांगत आहे ते शांतपणे ऐकून डोळयातील भावनेतून एक प्रकारे मान्यता देत आहे असे वाटते. केशभूषेत केसांना मधोंमध भांग पाडून पाठीमागे वेणी सोडली आहे. सुरसुंदरीच्या केसाच्या भांगेच्या रेषेचे वळण चेहऱ्या प्रमाणे पाडले आहे. सुरसुंदरीने उपवस्त्र गळयाला गुंडाळून अंगावर न घेता शरीराच्या दोन्ही बाजूला सोडले आहे. हे उपवस्त्र गळयाला गुंडाळून पुढे हाताला गुंडाळून पुढे काखेला गुंडाळून दंडाला गुंडाळून पायापर्यंत खाली सोडले आहे. उपवस्त्राचे एक टोक उजव्या पायापर्यंत सोडताना कलाकाराने त्या वस्त्राला चुन्या पाडत जमीनीला स्पर्श केला आहे. तर डाव्या बाजूचे टोक डाव्या पायापर्यंत जमीनीला टेकवले आहे हे उपवस्त्र कमरेपासून पिळदार आकार देवून तो पीळ खालपर्यंत तसाच ठेवलेला आहे. कलाकाराने ज्याप्रमाणे एखादे वस्त्र पिळताना ज्या रेषा त्यावर निर्माण होतात त्याप्रमाणे या शीला खंडावर पीळाच्या रेषा काढून सजीवता आणली आहे. अधोवस्त्र दोन प्रकारचे आहे हे वस्त्र कमरेला कटीसुत्र बांधून ते उरूदाम अवस्थेपर्यंत गुंडाळले आहे तर दुसरे अधोवस्त्र मुक्तदाम असून उजव्या कमरेवरून डाव्या मांडीपर्यंत घेवून त्याला गाठ मारून पायाच्या मध्ये सोडले आहे. या कटीसुत्राची गाठ बरोबर मध्यभागी बांधून त्याचे चुन्यादार टोक पायामध्ये सोडले आहे. सुरसुंदरीच्या कानात मोठया आकाराची गोलाकार जाडजूड रिंग स्वरूपातील कर्णकुंडले आहेत. गळयामध्ये हिक्कासूत्र उदरापयैत लोंबणारे हारसूत्र हाताच्या दंडाला जाडजूड अंगद, हस्तवलय, कमरेला जाडजूड पाच पदराचा कमरपट्टा त्यावर चार पदरे लोंबकळत असणारा मेखला, गळयातील पायापर्यंत लोंबकळणारी एक माला, पायात पादवलय, तोडे किंवा नुपुर स्पष्टपणे दाखवले आहे. कलाकाराने केशभूषा, वेशभूषा व अलंकारात परिपूर्णता दाखवली आहे.

सुरसुंदरी क्रमांक - ४

सुरसुंदरी त्रिभंगी स्थानक प्रकारात आढळते सुरसुंदरीचा चेहरा पुर्णपणे उजव्या बाजूला आहे तर कंबर डाव्या बाजूला आहे सुरसुंदरीचा पाय उजव्या बाजूला दाखवले आहेत. सुरसुंदरीचे हात पाय पुर्णपणे तुटलेले आहेत सुरसुंदरीची नजर समोर असून खाली पाहत आहे असे वाटते. सुरसुंदरीचे केस उलटे फिरवून पाठीमागे बांधलेले आहेत. सुरसुंदरीचे उपवस्त्र गळयातून पाठीमागे घेवून परत काखेच्या आत पुढे घेवून सरळ दोन्ही टोके कमरेपर्यंत सोडली आहेत. अधोवस्त्र कटीसत्रात उरूदामाच्या स्वरूपात वापरले आहे. उरूदाम कमरेला गुंडाळून त्याची गाठ बांधून दोन्ही पायाच्या मध्ये सोडले आहे. सुरसुंदरीच्या कानात गोलाकार मोठे कर्णकुंडल, गळयामध्ये उदरापर्यंत लोंबणारा वळयावळयादार हारसूत्र आढळते या सुरसुंदरीच्या अंगावर अंलकार कमी आढळतात तसेच मुर्ती तुटलेली असल्याने वस्त्राची स्पष्टता जास्त करता येत नाही.

सुरसुंदरी क्रमांक - ५

सुरसंदरी ही त्रिभंगी अवस्थेतील स्थानक प्रकारात आहे. ही सुरसुंदरी चित्रार्ध स्वरूपात आहे. सुरसुंदरीचा चेहरा डावीकडे पुर्णपणे तिरपा असून तिरक्या नजरेने खाली बघत आहे. पायाची रचना, क्रमरेत दिलेला बाक यावरून थोडया प्रमाणात वाकून काहीतरी घेत आहे. सुरसुंदरीचा उजवा हात कोपरापासून तुटलेला आहे. तर डावा हात सरळ खाली कंबरेच्या बाजूला सोडला आहे. सुरसुंदरीच्या उजवा पाय डावीकडे घेवून पायाचा पंजा तिरप्या स्वरूपात डावीकडे ठेवला आहे तर डावा पाय त्याच्या पाठीमागे आहे. केशभूषेत उजव्या बाजूला समोरून दिसेल असे फुल लावलेले आहे.सुरसुंदरीचे उपवस्त्र गळयातून पाठीमागे सोडून परत काखेतून उजव्या व डाव्या दंडाला गुंडाळून दोन्ही बाजूला खाली सोडले आहे. उपवस्त्राची दोन्ही टोके कमरेजवळ हवेत उडत आहे असे दिसते. अधोवस्त्र कटीसूत्र उरूदाम पध्दतीने घातलेले आहे. येथीलही काही भाग तुटलेला आहे. सुरसुंदरीच्या कानात मोठया आकाराचे कर्णकुंडले गळयात हिक्कासूत्र, उदरापयैत लोंबणारे हारसूत्र पायापर्यंत लोंबणारी एक माला, पायात पासवलय, तोडे किंवा नुपुर इ. अलंकाराने सुशोभित केले आहे. डाव्या पायाच्या बाजूला एक गोलाकार भांडे आहे त्याचेही वरची बाजू तुटलेली आहे. कदाचित डाव्या हाताने ते भांडे उचलत असावे.

सुरसुंदरी क्रमांक - ६

सुरसुंदरी त्रिभंगी अवस्थेतील स्थानक प्रकारात चित्रार्ध स्वरूपात आहे. सुरसुंदरीचा चेहरा डावीकडे असून ती पुर्णपणे उजवीकडे पहात आहे. सुरसुंदरीचे नाक डावा हात खांदयापासून मनगटापर्यंत उजव्या पायाचा वरचा भाग, दोन्हीही पायाची बोटे तुटलेली आहेत. सुरसुंदरीच्या पायाची ठेवण उजवा पाय सरळ रेषेत, डावा पाय थोडासा तिरका करून उजव्या पायाच्या थोडेसे पुढे ठेवलेली आहे. सुरसुंदरीचा चेहरा गोलाकार असून तिची तिरकी नजर बाजूला आहे. केशभूषेत केस विंचरून पाठीमागे घेवून सोडले आहेत. सुरसुंदरीचे उपवस्त्र गळयाला गुंडाळून पाठीमागे सोडून परत काखेखालून घेवून दोन्ही बाजूच्या दंडाला गुंडाळून त्याची टोके दोन्ही बाजूला सोडलेली आहेत. त्याच्या तीन तीन चुन्या स्पष्टपणे दिसतात. अधोवस्त्र कमरेला गुंडाळून समोरच्या बाजूला गाठ बांधून पायाच्या मधोमध सोडले आहे. हे कटीसुत्र उरूदाम अवस्थेत आहे. सुरसुंदरीच्या कानात जाड व मोठे गोलाकार कर्णकुंडल, गळयात हिक्कासूत्र व उदरावर लोंबणारे हारसूत्र, कमरेला कमरपट्टा, हाताच्या दंडाला अंगद हातात हस्तवलय, पायात पादवलय नुपुर/तोडे, गळयात पायापर्यंत लोंबणारी एक माला इत्यादी अलंकार पहावयास मिळतात या सुंदरीला " मदयकुंभवाहक " सुंदरी असे म्हणतात.या सुंदरीचे अलंकार इतर सुरसुंदरीपेक्षा वेगळया प्रकारचे आकाराने जाड आहेत. सुरसुंदरीच्या उभारण्याचा डौल, भांडयाचा आकार, नजरेतील भाव उल्लेखनीय आहे.

सुरसुंदरी क्रमांक - ७

सुरसुंदरी त्रिभंगी अवस्थेत स्थानक स्थितीत आहे. सुरसुंदरीचा उजवा हात कोपरापासून, डावा हात मनगटापासून उजवा पुर्ण पाय, आणि डावा पायाच्या मांडीवरचा एक द्विलका तुटलेला आहे. सुरसुंदरीच्या गोलाकार चेहऱ्यावर केसांच्या मधोमध भांग पाडून केस दोन्ही बाजूला वळवलेले आहेत. मान थोडीशी खालच्या दिशेला तिरकी आहे आणि नजर डाव्या खांदयाच्या पाठीमागे पहात आहे अशा स्वरूपात आहे. उजवा हात खांदयाबरोबर वरती घेतलेला आहे मात्र त्यापुढील भाग तुटलेली आहे. डावा हात सरळ कंबरेपर्यंत खाली आणून कोपरातून समोरील बाजूस वरती घेतला आहे. उजवा पाय एका गोलाकार जागेत गुडघ्यामध्ये मुडपून उभा ठेवला आहे यामुळे पायाचा पंजा उभ्या स्वरूपात स्पष्टपणे दिसतो. डावा पाय सरळ रेषेत जमीनीवर गोलाकार जागेला शेजारी ठेवला आहे. सुरसुंदरीचे उपवस्त्र पाठीवर सोडून उजव्या व डाव्या दंडाला गुंडाळून दोन्ही बाजूला सोडले आहे. अधोवस्त्रातील कटीसूत्र कमरेला गुंडाळून समोरील बाजूस गाठ बांधून पायाच्या मध्ये लोंबकळत सोडले आहे. कटीसुत्र उरूदाम स्वरूपात घातलेले आहे. सुरसुंदरीच्या अलंकारात कानात गोलाकार कर्णकुंडले गळयामध्ये हिक्कासूत्र, उदरावर लोंबकळता हारसूत्र जाडजूड साखळीच्या स्वरूपात दोन पदरी आहे. दंडाला अंगद कमरेला पाच पदरी कमरपट्टा तीन पदरी लोंबकळणारा मेखाला पायापर्यंत लोंबकळणारी एक माला, पायात पादवलय, आणि नुपुर/तोडे जाडजूड स्वरूपात आहेत.

सुरसुंदरी क्रमांक - ८

सुरसुंदरी नृत्य करताना दिसत आहे. सुरसुंदरीच्या पुर्ण चेहरा उजवा हात, उजवा पाय तुटलेला आहे. सुरसुंदरीचा चेहरा तुटलेला असला तरीही तो पुर्णपणे काटकोनात डावीकडे फिरवल्याचे दिसते. उजवा हात एखादया वादयावर थाप दिल्यावर परत वरती कशाप्रकारे येतो त्याप्रमाणे आहे. सध्याला हा हात दंडापयैत आहे. डावा हात सुमारे खाली असून हातामध्ये गोलाकार टाळ आहे. हाताचा तळवा कमरेतील वादयाच्या पाठीमागे धरला आहे. उजवा पाय नृत्य करण्याच्या स्थितीमध्ये कमरेइतका वरती घेतला आहे. त्याचा फक्त पंजाच दिसतो हा पंजा उभा असून त्याची बोटेजमीनीच्या दिशेला आहे तर डावा पाय थोडासा गुडघ्यात तिरका करून जमीनीवर ठेवलेला आहे. सुरसुंदरीचे उपवस्त्र पाठीवरून पुढे घेवून दोन्ही हाताच्या दंडावरून खाली सोडले आहे. उजवा हात वरती गेल्याने वस्त्राचे उजव्या हाताकडील टोकालाही दोन ठिकाणी वळण देवून ज्याप्रमाणे वाजवताना वस्त्र हवेत उडते ते दाखवण्यात कलाकार यशस्वी झाला आहे. अधोवस्त्र कटीसूत्र उरूदाम स्थितीत बांधले आहे. सुरसुंदरीच्या अलंकारात कानात मोठी गोलाकार कर्णकुंडले, गळयात हिक्कासूत्र उदरावरती लोंबणारे हारसूत्र जाड व साखळीदार असून कमरेला कमरपट्टा, पायात पादवलय, नुपुर/तोडे इ. आढळतात.

येथील स्वर्गीय सौंदर्याची कला-शिल्प या लावण्यतळया दर्याचे नंदादीप वाटतात. त्यांच्या दर्याचे सतेज दर्शन घडविताना शिल्पकाराने आपले नैष्टिक मनोबल दूर ठेवून निर्गम प्राणत्व ओतून सुरसुंदरी घडविल्या आहेत. या सर्व सुरसुंदरीचा अंगभंग व ढंग त्याच्या मात्रामात्रातून ओतप्रोत भरलेला आहे.अशा या स्वर्गमंडपात मादक मदनिकांचे सौंदर्याविष्कार घडविताना ही सारी मांगल्याची प्रतिके नवीन शिल्पकाराने अविकारी आणि अविचल वृत्तीने देहभान सोडून सौंदर्यातील मादकतेला शिल्प रूपात परिवर्तीत केले आहे.या कल्पशिल्पांचा साज जरी मादक, उन्मादक आणि मोहक असला तरी बाज मात्र मांगल्याने आणि अभिजात सौंदर्याने भरला आहे.कला ही सत्य, सुंदरता आणि कल्याण द्योतक आहे, हे शिल्पकाराने सिध्द करून दाखवले आहे. शिल्पकारात ही अलौकीक कलाशिल्पे घडविली त्यावेळी या शिल्पकाराने भाव, विश्व आणि कल्पनाविश्व त्या क्षणापुरते तरी आकाश आणि अवकाश येवून पूर्णानंदात विलीन केले आहे. वास्तूशिल्पात व कलाशिल्पात शिल्पकारांनी कलाकौशल्याचा सार सर्वस्वपणे ओतला आहे. भरजरी तलम वस्त्राप्रमाणे आभूषणे किंवा अलंकार पाषाणाच्या माध्यमातून हूबेहूब घडविलेली आहेत. सुरसुंदरीच्या अंगावरील साजशृगांर स्वर्गीय वाटावा असा शिल्पित केला आहे. बांधेसुद आणि प्रमाणबध्द शरीरयष्टी प्रत्येक शिल्पात शिल्पित केली आहे. सौंदर्यातील मादकता त्यात शिगोशिगी भरलेली आहे. डौलदार अंगभंगातील शरीररचना वैविध्यपुर्ण करून लावून घडविल्या आहेत. जीवनातील रसिकता, विलासीपणा, स्वर्गीय जीवनपध्दती प्रत्येक कलाशिल्पातून दाखवली आहे. यातूनच शिल्पकाराच्या कलात्मक जाणिवांची अनुभूती येते. मंदीराच्या रचनेच्या निमित्ताने सौंदर्याचे " अमृतकुंभ " कलाशिल्पाच्या रूपाने स्पष्ट केले आहे. स्वर्गीय कल्पनांचे सौंदर्य, माधुर्य, नादनिनाद, आनंद, उमंग आणि उर्मी याचे जागते वातावरण या स्वर्गमंडपात निर्माण केले आहे. हा एक अलौकीक कलाविष्कार आहे.

शिल्पकाराने सुरसुंदरीच्य तारूण्याचा, लावण्याचा बहर मात्रामात्रतून प्रतिबिंबित केला आहे. त्यांची लुसलुसीत कोमल काया, डौलदार रेश्मी बांधा, शरीरसौष्ठव, सिंहकटी कंबर, भारदस्त वक्षस्थळे, पारदर्शक आभूषणे, केशभूषा व वेशभूषा यांचे तारतम्य भरवलेले आहे. सुदृढ व सुकोमल शरीररचनेतून आलेल्या या सुरसुंदरी अनंत रूपातून, अनंत अंगभंगातून अस्तित्वात आलेल्या आहेत. या रूपगर्विता, वाद्यगर्विता विविधांगी नृत्यमुद्राच्य अभिनयातून शिल्पकृती शिल्पकारांनी शिल्पाकिंत केल्या आहेत. नृत्य, वादनात त्या रमून गेल्या आहेत. प्रत्येक सुरसुंदरीच्या कलात्मक अशी केशरचना हिक्कासूत्र, हारसूत्र, कटिसूत्रे, माला, कर्णकुंडले, हस्तवलय, पादवलय, तोडे किंवा नुपुर यातून कलेची दृष्टी स्पष्ट दिसते. शिल्पकाराने सुरसुंदरीच्या शरीरावरील वस्त्राप्रमाणे आणि नखाशिखांत घातलेली आभूषणे शोधक नजरेने बारकाव्यासह चित्रीत केली आहे.यौवनाने भरलेल्या सुरसुंदरीचे गात्रागात्रातून नक्षत्र लावण्याने फुललेले आहे. चिरतरूण सौंदर्य लाभलेल्या कमल कोमल कायेची ही शिल्पे साजशृगांराने मन मोहून टाकतात. या कलाशिल्पाच्या अंगाप्रत्यांगातून सौंदर्याचा वर्षाव होतो. सुरसुंदरींना दुर्मीळ असे दैवी लावण्य लाभलेल्या या प्रतिमा सुखासीन आणि नयनमनोहरी वाटतात. सुरसुंदरीच्या गळयातील हिक्कासूत्र (कंठमाळा), हारसूत्र (ऱ्हीनमाळा), कृशकटिका दिलेला हलकासा डौल त्यावर पडलेला रत्नखचित मेखला, नाजूक विळखा आणि पारदर्शी प्रावरणे त्यांच्या काठापदरांना लोंबकळणाऱ्या अग्रलाटा, कृष्ण कमलावत नेत्रदय, कलात्मक विविधाकृती, कानामधील कर्णकुंडले, चेहऱ्यावरील वेगवेगळे भाव, हनुवटांची चित्ताकर्षक ठेवण, चाफेकळी टोकदार नासिका, कर्दळी गर्भस्तंभाप्रमाणे सौष्ठवयुक्त बाहू. त्या मृदल बाहूदंडावर असणारे अंगद, उठावदार नाजूक मनगटावर घातलेली कंकणे (हस्तवलय), गजशुंडेप्रमाणे भासणारी परिपुष्ट गंधने त्यावरील वलयांकित उरूदाम, कर्मपृष्ठावत नितंबावर आभायमान हेणारे कटिसूत्र मेखला, त्यांची कुशलतापुर्ण केलेली कलाकुसर, अप्रतिम नक्षिकाम, शंखाच्या वलयाप्रमाणे वळलेले मृदल मांसल गुडघे, त्याखालील साजूक पायाच्या पुष्ट पोटऱ्या, त्यावर पुढुन रूळणारे मुक्तदाम आणि पायातील पादवलय, नुपुर किंवा तोडे, गळीकंठी धारण केलेल्या माला इ. सर्व सुडौल सौष्ठवयुक्त शरीराच्या अंगभंगावर शोभून दिसणारा साजशृगांर यातील कलाकुसरीने बारकाईने आणि वैशिष्टये शिल्पकाराने असाधारण कारागिरीतून सिध्द केली आहे. त्यामुळेच या पाषाण प्रतिमांना देहवयावांना स्वर्गीय सौंदर्याची झाक प्राप्त झाली आहे.

निष्कर्ष -

१) हत्तरसंग कुडल संगम येथील मूर्तीकाम सौष्ठवपुर्ण व सफाईदार घडवलेले असून प्रेक्षणिय व लक्षणीय आहे.

२) येथील प्रत्येक सुरसुंदरीवर दागदागिन्याचा अतिरेक, शरीरयष्टीचा डौल पूर्णपणे झाकून टाकतो.

३) येथील शिल्पकलेत कल्पकता व कौशल्य प्रत्ययास येते.

४) सुरसुंदरीच्या मुर्त्या ठेंगू, सुबक व विपुल दागिन्याच्य आढळतात त्यावर होयसळ शैलीचा प्रभाव दिसतो.
५) येथील शिल्पे सफाईदार कलात्मक सादरीकरण, रसरसीत वास्तववादी आणि आकर्षक कलात्मतेने घडवलेले आहेत.
६) सुरसुंदरीच्या तलम रेखीव बांधा, आकर्षक अंलकार, वैशिष्टयपुर्ण विविध केशरचना, आकर्षक नयन, त्रिभंगी अवस्था यामुळे आकर्षक व अप्रतिम आहे.
७) सुरसुंदरीचे अप्रतिम शारिरीक ठेवण, नृत्यमय व लयदार आहे.
८) सुरसुंदरी हे नवनिर्मिती, सृजनशिलता, कलात्मकता इत्यादीचेपरिपुर्ण प्रतिक आहे.

संदर्भ ग्रंथसुची -

१) कळसेकर टी.एल., महाराष्ट्राचे खजुराहो- खिद्रापूर, काळशेखर प्रकाशन पुणे - १९९७
२) भिडे गजानन प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर २००२
३) जोशी माधवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, अनमोल प्रकाशन, खंड ७ वा, २००४
४) सोमपुरा प्रभाशंकर, भारतीय शिल्पसंहिता, सोमैय्या पब्लिकेशन्स, प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई १९७५
५) देगलुरकर गो.ब., सुरसुंदरी, भारतीय विद्याभवन पुणे केंद्र २००४
६) भिडे ग.ल., श्रीक्षेत्र कुडलसंगम, श्रीक्षेत्र संगमेश्वर परिसर सुध्ससरणा समिती द्वारा प्रकाशन, हत्तरसंगकुडल २०००
७) प्रत्यक्ष सर्वेक्षण